ePaper

## ..असे लढवय्ये देशाला नको!, शरद पवार यांची पंतप्रधानांवर टीका



|वर्ष - 6 | अंक - 296 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- जलदगतीने सेवा पुरविण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र कटिबद्ध !
- काँग्रेसमध्ये कोणताही वाद नाही!
- अदानीमुळे गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान


www.mahaenews.com | |शनिवार , दि. 11 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# हतबल राष्ट्रवादी अन् उसणे अवसान!

## माघारीसाठी कलाटेंच्या दारात रांगा : स्वबळावर लढण्याची हिंमत नाही का?

**| पिंपरी | महाईन्यूज |विशेष प्रतिनिधी |**

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीची घोषणा झाल्यानंतर 'घड्याळ' चिन्हावरच निवडणूक लढवली पाहिजे आणि उमेदवार राष्ट्रवादीचाच कार्यकर्ता हवा... असा एल्गार करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नेत्यांची हतबलता आणि उसणे अवसान चव्हाट्यावर आले आहे.**




राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी चिंचवड मतदार संघ हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला आहे, असा दावा करीत या मतदार संघातून राष्ट्रवादीचाच उमेदवार आणि 'घड्याळ' चिन्हावर महाविकास आघाडीकडून लढवावा, असा ठराव लगबगीने पक्षश्रेष्ठींना पाठवण्यात आला होता. त्यामध्ये राहुल कलाटे हे महाविकास आघाडीचे उमेदवार होवू शकतात, अशी धास्ती होती.

महाविकास आघाडीकडून विठ्ठल उर्फ नाना काटे यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर जल्लोष आणि आत्मपौढी मिरवणारे राष्ट्रवादीचे स्थानिक नेते उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची दिवशी (दि.१०) राहुल कलाटे यांच्या कार्यालयाबाहेर रांग लावून उभा होते. यामध्ये मावळचे आमदार सुनील शेळके, पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी महापौर योगेश बहल यांच्यासह अनेकांची उपस्थिती दिसली.

दोन दिवसांपूर्वी कलाटे आमचेच आहेत, असा दावा करणारे आमदार सुनील शेळके "कलाटेंच्या मागे कोणी नाही. त्यांनी स्वत:ला शिवसेनेचा नेता समजू नये" असा सूर बदलला. शिवसेना संपर्क प्रमुख सचिन आहेर स्वत: पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा निरोप घेवून आले. राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनीही निरोप पाठवला. परंतु, राहुल कलाटे आपल्या निर्णयावर ठाम राहिले. शेवटच्या मिनिटापर्यंत राष्ट्रवादीच्या नेत्यांनी कलाटे यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कलाटे उमेदवारीत सरस होते, याला राष्ट्रवादीच्याच नेत्यांची आपल्या कृतीतून पुष्टी दिल्याचा संदेश मतदार संघातील नागरिकांपर्यंत गेला आहेत.

वास्तविक, उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आणि राहूल कलाटे यांनी माघार घेण्यास नकार दिल्यानंतर मनधरणीसाठी त्यांच्या कार्यालयापर्यंत जाण्याची राष्ट्रवादीच्या नेत्यांना आवश्यकता नव्हती. राष्ट्रवादीचे डझनभर नेते, पदाधिकारी, २५० हून अधिक युवक आघाडीचे कार्यकर्ते मतदार संघात दिवस-रात्र राबत आहेत. गावनिहाय, प्रभागनिहाय माजी नगरसेवकांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे.



### नाना काटेंना चिंचवडचे आमदार व्हायचे की, पिंपळे सौदागरचे?

चिंचवड विधानसभा निवडणुकीची पोटनिवडणूक जाहीर झाली. त्यानंतर नाना काटे यांनी निवडणुकीसाठी इच्छुक असल्याचा दावा केला. वास्तविक, नाना काटे यांनी भाजपाबहूल भागात राष्ट्रवादीचा झेंडा फडकत ठेवला, ही बाब उल्लेखनीय आहे. त्यांचा अनुभव आणि पक्षाप्रति असलेले 'डेडीकेशन' यामुळे नाना उमेदवारीचे दावेदार निश्चितपणे होते. पण, उमेदवारीची घोषणा झाली अन् नानांनी पहिल्या झटक्यात गाव एकत्रित केला. "आता आमदार पिंपळे सौदागरचाच करायचा" असा निर्धार ग्रामस्थांनी केल्याचे सोशल मीडियावर हेतूपुरस्सर वातावरण निर्मिती केली. त्यामुळे नाना काटे यांना चिंचवड मतदार संघाचे आमदार व्हायचे आहे का? पिंपळे सौदागरचे ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. वास्तविक, मतदार संघाचा सर्वसमावेश विचार करणारा नेता चिंचवडला अपेक्षीत आहे. नवी सांगवी, जुनी सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे निलख, चिंचवड गाव, केशवनगर, वाल्हेकरवाडी, रावेत, किवळे, मामुर्डी, पुनावळे, वाकड, काळाखडक, थेरगाव, काळेवाडी, रहाटणी आदी गावांतील मतदारांची साथ नानांना नको का? असा कळीचा मुद्दा भाजपा महायुती आणि अपक्ष उमेदवाराकडून उपस्थित केला जावू शकतो. परिणामी, सर्वच पक्षांनी पिंपळे गुरव किंवा सांगवीचा आमदार, वाकडचा आमदार... असा संकुचित मुद्दा उपस्थित न करता सर्वसमावेशक राजकीय प्रगल्भता दाखवावी, अशी अपेक्षा पिंपरी-चिंचवडकरांची आहे.

# लक्ष्मण जगताप यांच्या आठवणींनी लोकांना गहिवर, अश्रू अनावर!

## अश्विनी जगताप यांना प्रचंड सहानुभूती : नागरिक म्हणतात... 1 लाखाचे मताधिक्य हिच लक्ष्मणभाऊंना श्रद्धांजली

|पिंपरी चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपाची उमेदवारी जाहीर होताच दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या निधनाचे दुःख बाजूला सारून त्यांच्या पत्नी आणि भाजपच्या उमेदवार अश्विनी जगताप प्रचाराच्या मैदानात उतरल्या आहेत. लक्ष्मणभाऊ जगताप यांनी जिवाची पर्वा न करता पक्षानिष्ठा दाखवून दिली होती. त्यामुळे त्यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांच्या प्रचार मोहिमेत भाजप आणि मित्रपक्षाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची त्यांना परिवारासारखीच साथ मिळत आहे. त्यांच्या साथीने अश्विनी जगताप यांनी प्रचारात आघाडी घेत संपूर्ण चिंचवड विधानसभा मतदारसंघ अक्षरशः पिंजून काढला आहे. त्यांच्या प्रत्येक भेटीत दिवंगत लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या आठवणीने लोक अक्षरशः गहिवरत आणि रडत असल्याचे चित्र आहे. लक्ष्मणभाऊंनी मतदारसंघात केलेला विकास, नागरिकांना केलेल्या मदतीच्या आठवणींना लोक उजाळा देत आहेत. तुम्हाला एक लाखांहून अधिक मताधिक्यांनी विजयी करूनच आम्ही लक्ष्मणभाऊंना खरी श्रद्धांजली वाहणार आहोत, असे वचनच लोक त्यांना देत आहेत. अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या गृह भेटीला मतदारसंघातील महिलांचा उदंड प्रतिसाद मिळतो आहे. चांगले वक्तृत्व आणि महिला व युवतींशी सहज संवाद यामुळे त्यांचा गृहभेट दौरा निवडणूक प्रचारात कमालीचा प्रभावी ठरतो आहे.



# जलदगतीने सेवा पुरविण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र कटिबद्ध !

## » बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक आशीष पांडे यांचे प्रतिपादन

।पुणे । महाईन्यूज ।

**भारतातील प्रत्येक जिल्ह्यात बँकेची किमान एकतरी शाखा असावी, या उद्देशाने सध्या बँक ऑफ महाराष्ट्र काम करत आहे. आजच्या आधुनिक युगात ग्राहकांना तत्पर सेवा मिळाल्यास ग्राहक बँकेबरोबर जोडला जातो. त्यामुळेच स्वतः च्या विस्ताराच्या बरोबरीने ग्राहकाला जलदगतीने सेवा पुरविण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र कटिबद्ध असल्याचा विश्वास बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक आशीष पांडे यांनी व्यक्त केला.**

बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने बँकेच्या ग्राहकांसाठी



### पुणे पूर्वच्या वतीने 'ग्राहक संपर्क अभियान' : सुमारे 78 कोटी रुपयांचे कर्ज मंजुरी प्रस्तवांचे वाटप

"ग्राहक संपर्क अभियान" उपक्रमाचे आयोजन फातिमा नगर येथील केदारी गार्डन येथे करण्यात आले होते. या उपक्रमाला बँकेचे सुमारे १३० पेक्षा जास्त ग्राहकांनी भेट दिली. यावेळी सुमारे ७८ कोटी रुपयांचे मंजूर कर्ज प्रस्तावांचे वितरण आशीष पांडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बँक ऑफ महाराष्ट्राचे पुणे पूर्व विभागाचे विभागीयप्रमुख डॉ. जावेद क्यू. मोहमावी, कार्यकारी संचालक आशीष पांडे, पुणे पश्चिम विभागाचे विभागीयप्रमुख राहुल वाघमारे, पुणे शहरचे विभागीयप्रमुख व सरव्यवस्थापक राजेश सिंग आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बँक ऑफ महाराष्ट्रच्या वरिष्ठ व्यवस्थापक डॉ. शिवंगी रॉय यांनी केले. प्रस्तावना विभागीय व्यवस्थापक डॉ. जावेद क्यू. मोहमावी यांनी तर आभारप्रदर्शन लोणी काळभोर शाखेचे व्यवस्थापक प्रद्युम्न कळसकर यांनी केले.

### 2024 पर्यंत 5 लाख कोटींचा व्यवसाय करण्याची शक्यता

**» चालू आर्थिक वर्षात बँक ऑफ महाराष्ट्र सुमारे ३.८० लाख कोटीपर्यंत व्यवसाय करणार आहे. त्यातच भारताच्या सुमारे १५० जिल्ह्यात बँकेच्या शाखा देखील स्थापन करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. त्यामुळे पुढील २०२३-२४ या आर्थिक वर्षात बँक ऑफ महाराष्ट्र सुमारे ५ लाख कोटींचा व्यवसाय करू शकेल, अशी शक्यता बँकेचे कार्यकारी संचालक आशीष पांडे यांनी बोलताना व्यक्त केली.**

### एनपीएमध्ये घट हीच बँकेवरील विश्वासाची पावती

**» अनेक बँका एनपीएमुळे अडचणीत आहेत, असे असताना देखील बँक ऑफ महाराष्ट्रच्या एनपीएमध्ये घट होत असल्याचे दिसून येत आहे. एनपीए घटल्याने बँकेचा ग्राहकांवर व ग्राहकांचा बँकवरील विश्वास मजबूत होण्यास मदत होत आहे, असे बँकेचे कार्यकारी संचालक आशीष पांडे यांनी सांगितले.**

---

# भाषा ही केवळ माणसाला जोडण्याचे काम करते

## » भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांचे प्रतिपादन

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू या सर्व भाषा समान असून कोणतीच भाषा कोणत्याही प्रकारचे वितुष्ट निर्माण करत नाही. भाषा ही केवळ माणसाला जोडण्याचे काम करते, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.**



एमसीई सोसायटीच्या 'स्पोकन मराठी अकादमी' यांच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या सांगता समारोह प्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. ए. इनामदार, महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन सोसायटीच्या उपाध्यक्षा आबेदा इनामदार, सचिव इरफान शेख, शिक्षण संचालक महेश पालकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, मराठी भाषेमध्ये प्रत्येकाचं धर्माच्या साहित्यिकांनी योगदान दिले आहे. कुठलाही खरा धर्म द्वेषाची भाषा बोलत नाही. त्यामुळे भाषा आणि धर्म हे लोकांना एकत्र आणण्यासाठी महत्वाचे घटक आहेत, असे सबनीस म्हणाले.

डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. ए. इनामदार म्हणाले, संस्कृत भाषेतून इतर सगळ्या भाषांचा विकास झाला आहे. परंतु प्रांतीय भाषा आता लोप पावत चालल्या असून इंग्रजीचे प्रभाव वाढत आहे. इंग्रजी गरजेची असली तरी आपली मातृभाषा मराठी टिकवून ठेवणे, हे आपले कर्तव्य आहे, असे डॉ. इनामदार यांनी सांगितले.

गझल संशोधक डॉ. अविनाश सांगोलेकर व गझलकार प्रदीप निफाडकर यांच्या दरम्यान मराठी गझलची जुगलबंदी झाली. या जुगलबंदीला विद्यार्थी, शिक्षक व उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नूरजहाँ शेख, सूत्रसंचालन दिलशाद शेख यांनी तर आभार प्रदर्शन निलोफर पटेल यांनी केले.


### पंधरवड्याच्या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन

» स्पोकन मराठी अकादमीच्या वतीने १९ ते ३१ जानेवारी दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्रीयन खेळ, बडबडगीत स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, आनंद मेळावा, चिकणमाती स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा, नाट्यछटा स्पर्धा, क्षेत्रभेट व महाराष्ट्राची लोकधारा या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थी आणि शिक्षक यांनी आपला उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला, अशी माहिती स्पोकन मराठी अकादमीच्या संचालिका डॉ. नूरजहाँ शेख यांनी दिली.

---

## शॉर्ट न्यूज

### पाषाण-सूस पूल परिसरात वाहतूक बदल



पुणे : या भागातील पर्यायी मार्ग पुढीलप्रमाणे- बंगळुरू बाह्यवळण मार्ग परिसरातील सोसायटीत राहणाऱ्या नागरिकांसाठी सूस पूल ओलांडताना २०० मीटर अंतरावर उजवीकडे वळून ननावरे भुयारी मार्गाने इच्छितस्थळी जावे. पाषाण मार्गे साताऱ्याकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी साई चौक पाषाण येथून डावीकडे वळून सुतारवाडी, पाषाणमार्गे इच्छित स्थळी जावे. हिंजवडी, सूस तसेच मुंबईकडे जाण्यासाठी सूस पुल ओलांडून २०० मीटर अंतरावर उजवीकडे वळून सेवा रस्त्याने मुंबईकडे तसेच सूसकडे जावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी केले आहे. वाहतूक बदलांविषयी काही हरकती किंवा सूचना असल्यास नागरिकांनी वाहतूक विभाग, पोलीस उपायुक्त, जेल रस्ता, येरवडा, पुणे-४११००६ येथे लेखी स्वरुपात पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बंडाच्या 'मशाली' मुळे कारवाईचा 'आहेर'!

## » सचिन आहेर यांची टीका: राहुल कलाटे यांच्याकडे पद नाही, त्यांच्या मागे कोणी नाही

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत महाविकास आघाडी विरोधात बंडखोरी केलेल्या राहुल कलाटे यांच्यावर पक्षाकडून कारवाई होणार असल्याचे संकेत शिवसेना संपर्कप्रमुख सचिन अहिर यांनी दिले आहेत. त्यामुळे कलाटे यांच्यावर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे काय कारवाई करणार? याकडे पिंपरी-चिंचवडकरांचे लक्ष लागले आहे. तसेच, बंडाची 'मशाल' पेटवल्यामुळे कलाटे यांना शिवसेनेकडून करावाईचा 'आहेर' मिळेल, अशी शक्यता आहे.**



महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांच्या प्रचारार्थ शिवसेना पदाधिकार्यांची बैठक काळेवाडी फाटा येथील हॉटेलमध्ये आज संपन्न झाली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे आमदार सुनिल शेळके, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, शिवसेनेचे माजी आमदार गौतम चाबुकस्वार आदी उपस्थित होते. राहुल कलाटेंच्या बंडखोरीबाबत सचिन अहिर यांना विचारले असता ते म्हणाले की, मुळामध्ये ते फक्त गटप्रमुख होते आणि नगरसेवक होते. त्यांच्याकडे दोन्ही पद राहिलेलं नाही. सेना भवनातून त्यांच्यावर पुढील कारवाईची प्रक्रिया केली जाईल. पक्ष म्हणून इथून पुढे त्यांचा कोणताही संबंध राहणार नाही. राहुल कलाटे यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज कायम ठेवल्यामुळे सर्वप्रथम त्यांच्यावर कारवाई होईल. इतर त्यांच्यासोबत जे असतील त्यांच्याशी सर्वप्रथम चर्चा केली जाईल. तडकाफडकी कोणतीही कारवाई होणार नाही. यात सर्वांची समजूत घालण्याचा आम्ही प्रयत्न करू, त्यांच्यासोबत गेलेल्यांची संख्या फक्त पाच ते दहा टक्केच आहे. जे कोणी नगरसेवक त्यांच्यासोबत असतील त्यांच्याशी मी स्वतः चर्चा करेल. त्याही पलीकडे जाऊन त्यांनी कोणती भूमिका घेतली तर पुढे महानगरपालिका निवडणुका आहेतच असे सचिन अहिर यांनी म्हटले आहे.

महाविकास आघाडीचा प्रमुख दावेदार ते बंडखोर उमेदवार असा प्रवास झालेले राहुल कलाटे यांच्याविरोधात शहर राष्ट्रवादी एकवटली आहे. राहुल कलाटे डोईजड झाल्यास २०२४ ची विधानसभा निवडणूक हाताबाहेर जाईल, अशी धास्ती असल्यामुळेच राष्ट्रवादीच्या पायाखालची वाळू सरकली आहे, अशी टीका राहुल कलाटे समर्थकांकडून करण्यात येत आहे.

### कारवाईसाठी राष्ट्रवादीचा दबाव?



» दरम्यान, राहुल कलाटे यांच्यावर तात्काळ कारवाई करावी. याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून दबाव असल्याचे बोलले जात आहे. कलाटेंवर कारवाई केल्यास त्यांच्यामागे असलेल्या नगरसेवकांमध्ये अस्वस्थता निर्माण होईल. त्यामुळे कलाटे यांची ताकद कमी होईल. त्याचा फायदा महाविकास आघाडीच्या उमेदवाराला होईल, अशी रणनिती आखण्यात आली आहे. त्यासाठीच सचिन आहेर यांना पत्रकार परिषद घेण्यास सांगितले. त्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादीचे आमदार, शहराध्यक्ष उपस्थित होते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

"नुरा कुस्ती, सुपारी... असली भाषा राहुल कलाटे यांना शोभत नाही. शिवसेनेचा एकही स्थानिक पदाधिकारी त्यांच्याकडे अर्ज माघारी घ्या म्हणून आला नव्हता. त्यांनी स्वत:ला शिवसेनेचा नेता समजू नये. कलाटे यांच्या मागे एकही पदाधिकारी नाही.

**- सुनील शेळके,** आमदार, राष्ट्रवादी.

---

# नुरा कुस्ती, सुपारीबाज भूमिका नाहीच : राहुल कलाटे

## »निवडणूक लढवण्याचा निर्णय : उमेदवारी अर्ज माघारी घेतला नाही

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत शिवसेनेचे माजी नगरसेवक राहुल कलाटे यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवत रणशिंग फुंकले आहे. त्यामुळे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, संपर्कनेते सचिन अहिर यांच्या शिष्टाईला अपयश आले. कलाटे यांनी उमेदवारी कायम ठेवल्याने महाविकास आघाडीची उमेदवारी मिळालेल्या राष्ट्रवादीचे नाना काटे यांच्या अडचणीत वाढ झाल्याचे दिसते.**



चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीच्या उमेदवारीसाठी महाविकास आघाडीकडून सुरुवातीपासून राहुल कलाटे यांना नाव आघाडीवर होते. कलाटे आणि नाना काटे यांच्यात उमेदवारीसाठी चुरस निर्माण झाली होती. परंतु, राष्ट्रवादीने उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्यादिवशी नाना काटे यांच्या गळ्यात उमेदवारीचा माळ टाकली. ऐनवेळी महाविकास आघाडीकडून उमेदवारी नाकारल्याने नाराज झालेल्या राहुल कलाटे यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. कलाटे यांची चिंचवडमध्ये मोठी राजकीय ताकद आहे.

मागीलवेळी 1 लाख 12 हजार मते घेतली होती. त्यामुळे कलाटे यांनी उमेदवारी अर्ज मागे घ्यावा यासाठी महाविकास आघाडीने जोरदार प्रयत्न केले. कलाटे यांचे शिवसेनेतील पूर्वीचे सहकारी आणि राष्ट्रवादीचे खासदार डॉ. अमोल कोल्हे, कलाटे यांचे जवळचे मित्र नवनाथ जगताप यांच्या माध्यमातून गळ घालत राष्ट्रवादीने कलाटे यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी प्रयत्न केले. पण, कलाटे यांची समजूत निघाली नाही.

### चिंचवडमध्ये तिरंगी लढत...

» शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख सचिन अहिर हे सकाळीच कलाटे यांच्या वाकड येथील जनसंपर्क कार्यालयात दाखल झाले. समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी बोलणे करुन दिले. आपण कार्यकर्त्यांशी बोलून निर्णय घेवू असे कलाटे यांनी जाहीर केले होते. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची दुपारी तीनची मुदत संपली. पण, कलाटे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही. त्यामुळे ठाकरे, अहिर यांच्या शिष्टाईला यश आले नाही. आता कलाटे तिस-यांदा विधानसभा निवडणुकीला सामोरे जात आहेत. कलाटे यांनी उमेदवारी कायम ठेवल्याने चिंचवडमध्ये तिरंगी लढत होईल.

### मनधरणीनंतरही कलाटे बंडखोरीवर ठाम

» चिंचवड विधानसभा पोट निवडणुकीतून राहुल कलाटे यांनी माघार घेण्याकरिता शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न सुरू आहेत. आज सकाळी शिवसेना नेते सचिन अहिर यांनी कलाटे यांची भेट घेतली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते योगेश बहल व मोरेश्वर भोंडवे यांनी देखील कलाटे यांची भेट घेऊन मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. मात्र कलाटे त्यांच्या बंडखोरीवर अद्यापही ठाम राहिले आहेत. चिंचवड पोटनिवडणुकीतून माघार घेण्याकरिता अवघा अर्धा तास शिल्लक उरला आहे. आज दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी माघार घेण्याची मुदत आहे. राहुल कलाटे यांनी या निवडणुकीत त्यांची उमेदवारी कायम ठेवल्यास ही लढत तिरंगी होणार आहे. आता अवघ्या अर्धा तासात कलाटे माघार घेणार की लढणार हे चित्र स्पष्ट होणार आहे.

### कलाटे यांची अपक्ष उमेदवारी कायम

» चिंचवड विधानसभा पोटनिवडणुक राहुल कलाटे लढणार आहेत. या निवडणुकीत त्यांनी त्यांची अपक्ष उमेदवारी कायम ठेवली आहे. राहुल कलाटे यांनी माघार घेण्याकरिता शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न सुरू होते. आज सकाळी शिवसेना नेते सचिन अहिर यांनी कलाटे यांची भेट घेतली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते योगेश बहल व मोरेश्वर भोंडवे यांनी देखील कलाटे यांची भेट घेऊन मनधरणी करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र कलाटे बंडखोरीवर ठाम राहिले आहेत. चिंचवड पोटनिवडणुकीतून माघार घेण्याकरिता आज दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी माघार घेण्याची मुदत होती. राहुल कलाटे यांनी या निवडणुकीत त्यांची उमेदवारी कायम ठेवल्यामुळे ही लढत तिरंगी होणार आहे.

## संपादकीय »

# महागाईच्या रोगापेक्षा औषध भयंकर !

***भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीने अपेक्षेनुसार बुधवारी आधारभूत व्याजदर वाढवण्याचा निर्णय घेतला. हे व्याजदर पाव टक्क्यांनी वाढवण्यात आलेत. यामुळे आतापर्यंत ६.२५ टक्क्यांवर असलेला रेपो दर ०.२५ टक्क्यांनी वाढून तो ६.५० टक्क्यांवर गेला आहे.***

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीने अपेक्षेनुसार बुधवारी आधारभूत व्याजदर वाढवण्याचा निर्णय घेतला. हे व्याजदर पाव टक्क्यांनी वाढवण्यात आलेत. यामुळे आतापर्यंत ६.२५ टक्क्यांवर असलेला रेपो दर ०.२५ टक्क्यांनी वाढून तो ६.५० टक्क्यांवर गेला आहे. या व्याजदरवाढीमुळे रेपो दरांशी संलग्न सर्वच कर्जांचे जसे. गृहकर्ज, वाहन कर्ज, वैयक्तिक, शैक्षणिक कर्जांचे व्याजदर महागणार आहेत. वाढत्या महागाईला आटोक्यात ठेवण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने एप्रिल २०२२ पासून कठोर आर्थिक निर्णय घ्यायला सुरुवात केली होती. तेव्हापासून रेपो दरात थोडीथोडकी नव्हे, तर २२५ बेसिस अंशांची वाढ झाली आहे.

यामुळे अतिरिक्त तरलता स्थितीला चाप बसल्याचे आरबीआयचे म्हणणे आहे. असे असले तरी या सततच्या व्याजदरवाढीमुळे आधीच महागाईने होरपळत असलेल्या सर्वसामान्यांना मागील वर्षभरात मोठा आर्थिक फटका बसलेला आहे. सलग वाढत असलेल्या ईएमआयमुळे कर्जदार अक्षरश: हैराण झालेत. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर आरबीआयच्या चलनविषयक धोरण समितीची पहिलीच बैठक झाली. व्याजदरांबाबत निर्णय घेण्यासाठी ६ फेब्रुवारीपासून चलनविषयक धोरण समितीची बैठक सुरू होती. ही समिती आधारभूत व्याजदर आणि महागाईचे लक्ष्य निश्चित करते. सध्याच्या घडीला जागतिक अर्थव्यवस्थेचा अंदाज घेता वा खासकरून अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने केलेली व्याजदरवाढ लक्षात घेता, आरबीआय यापेक्षा काही वेगळा निर्णय घेईल, असे वाटतही नव्हते.

कोरोनाच्या हाहाःकाराने जागतिक अर्थव्यवस्थेचे अपरिमित नुकसान झाले वा अद्यापही होत आहे. हे असे किती दिवस चालणार या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नाही. पाठोपाठ रशिया-युक्रेन युद्धाने या जखमेवर मीठ चोळण्याचेच काम केले आहे. संपूर्ण जग आज इंधनदरांबाबतची अशाश्वतता, अन्नधान्य, रसायने-खते वा तत्सम गोष्टींची साखळी खंडित झाल्याने व्यथित झालेत. घटती मागणी, कमकुवत झालेली निर्यात, त्याचा उत्पादनाला बसलेला फटका, वाढलेली महागाई, त्यावर अंकुश ठेवण्यासाठी वाढवलेले व्याजदर या दुष्टचक्रात सध्या अनेक देश अडकलेत.

# बँकांचा विकास हाच अर्थव्यवस्थेचा विकास




बँकिंग प्रणाली हा जगभर परवलीचा शब्द सध्या बनलेला आहे. बँका कशा सुरु झाल्या, हा शब्द कसा आला. बँकांचा आणि अर्थव्यवस्थांचा अनन्यसाधारण असा संबंध आहे. जगातील अर्थव्यवस्थांच्या सध्याच्या सुदृढीकरणासाठी बँकांचे मोठे योगदान आहे. इतिहासाचा मागोवा घेतल्याशिवाय भविष्यातील वाटचाल सुकर होऊ शकत नाही, म्हणूनच बँकांच्या संदर्भातील विषयावर टाकलेला हा दृष्टिकोन गरजेचा ठरतो...भारत हा एक विकसनशील देश आहे. प्रामुख्याने शेतीवर आधारित असलेल्या आपल्या अर्थव्यवस्थेत आता हळुहळू इतर क्षेत्रांचे आर्थिक योगदान वाढत आहे. देशातील नागरिक आर्थिकदृष्ट्या साक्षर झाली आहेत.

यामध्ये बँकिंग क्षेत्राचे मोठे योगदान आहे. देशाच्या खेडोपाड्यात पोहोचलेल्या बँकांच्या जाळ्यामुळे जनतेला आर्थिकदृष्ट्या साक्षर करण्यात यश मिळाले आहे. एकूणच काय तर इटालियन मूळ असलेला बँक हा शब्द आता भारतातील घराघरांत पोहोचलेला आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणजे बँक मानले जाते.देशातील वित्तीय क्षेत्रातून जवळपास ७० टक्क्यांहून अधिक निधी या माध्यमातून प्रवाहित होत असतो. देशातील वित्तीय क्षेत्राचा हा सर्वांत आघाडीचा भाग आहे. बँक म्हणजे काय? संकल्पना कशी अस्तित्वात आली? बरं ही अस्तित्वात येण्याच्या अगोदर लोकांचे आर्थिक व्यवहार होत नव्हते का?असे अनेक प्रश्न आपल्या मनात येतात.

जगात पैशांच्या देवाणघेवाणीचे व्यवहार फार पूर्वीपासून चालू आहेत. पूर्वी लोक अन्नधान्य सोन्या-चांदीच्या वस्तू किंवा इतर किमती वस्तू सोनार किंवा सावकार यांच्याकडे ठेवून त्या मोबदल्यात पैसे घेत असत. आता हे बहुतांश व्यवहार बँकेच्या माध्यमातून होत असतात.

बँकिंगचे मूळ पुरातन काळापासून चालत आलेल्या सावकारी व नाण्यांची अदलाबदल तथा सराफी या व्यवसायात आढळते. भारतातही या व्यवसायातूनच पतपेढ्यांची निर्मिती झाली. या पेढ्या पाश्चिमात्य पद्धतीचे बँकिंग येईपर्यंत भारतीयांच्या बँकिंग व्यवहाराचे एकमेव साधन होत्या.

बॅबिलियनमध्ये देवस्थाने कर्ज, व्यवहार करत असत. तसेच खरेदी विक्रीसाठी व्यापारी आवश्यक प्रकारचे अधिकोषीय व्यवहार करत असे. बॅबिलियनमध्ये इगीबी बँक प्रसिद्ध होती. इटालियन भाषेतील बँका या शब्दावरून बँक शब्दाची उत्पत्ती झाली, असे जाणकारांचे म्हणणे आहे.तसेच जर्मन भाषेमध्ये याचा अर्थ संयुक्त उपक्रम असा देखील होतो. बँक याचा अर्थ काउंटर असा देखील मानला जातो. बँक हा शब्द सर्वसाधारणपणे ११५७ मध्ये पहिल्यांदा वापरला गेला, असे संदर्भ सापडतात. बँकेला मराठी भाषेत अधिकोष असे म्हटले जाते. अधिकोषाचा अर्थ मोठे भांडार किंवा मोठा कोश असा होतो. जिथे सामान्य जनता आपले अधिकचे पैसे साठवू शकते. देशाच्या अर्थव्यवस्थेत बँकांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. बँक ही एक वित्तीय संस्था आहे. याद्वारे जनतेचे पैसे जमा करणे, त्यांना कर्ज रक्कम देणे, आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देणे अशी प्रमुख आर्थिक कामे केली जातात.

बँकेची सर्वसामान्य व्याख्या अशी करता येईल, की जिथून पैशांची देवाण-घेवाण करता येते, अशी संस्था म्हणजे बँक होय. तसेच ज्या संस्थेकडून व्यवसाय करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना पैसे दिले जातात तसेच अधिकची रक्कम उपलब्ध होते त्याला बँक म्हणता येईल. सध्याच्या युगात आर्थिक विकास साधत असताना यामध्ये बँकांची भूमिका फार महत्त्वाची आहे. ग्रीक इतिहासात अधिकोष म्हणजे असे ठिकाण जिथे पैशांची अदलाबदल केली जाते. अर्थशास्त्रात बँकेला मनी लेंडर असेही संबोधले जाते. बँकेमधून पैशांचे स्थलांतर होत असते, असे वर्णन अर्थशास्त्रात आढळते. प्राचीन काळापासून बँकांची व्याख्या विविध विचारवंतांनी केल्या आहेत.

# हवामानबदल आणि आजार

**हवामानबदलाचे परिणाम हा सर्वत्र गंभीर चिंतेचा विषय असतानाच, हवामानातील बदलांमुळे नवीन आजार उद्भवत असून मनुष्य, प्राणी तसेच शेतीपिकांच्या आरोग्यालाही फटका बसत आहे.**

केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी लोकसभेला दिलेल्या उत्तरात या संदर्भातील तपशील दिले आहेत. त्यामुळे, या प्रश्नाकडे पुन्हा एकदा नव्याने लक्ष वेधले गेले आहे.काही हवामान-संवेदनशील आरोग्य समस्या तसेच आजार मानवामध्ये आढळून आले आहेत. हवामानबदल आणि मानवी आरोग्य या विषयावरील राष्ट्रीय कृती योजनेत (एनएपीसीसीएचएच), हवा-प्रदूषणासंबंधी आजार, हवामानबदल आणि आपत्तीसंबंधी आजार, उष्णतेमुळे उद्भवणारे आजार, कीटकजन्य तसेच जलजन्य आजार यांची नोंद घेण्यात आली आहे.त्या खेरीज प्राण्यांमध्ये आजारांचा उद्भव, प्रसार यांवरही हवामानातील बदलांचा परिणाम होत असल्याचे नोंदवण्यात आले आहे. हवामानाच्या स्थितीमुळे लम्पी त्वचारोग, एव्हियन एन्फ्लूएन्झा, आफ्रिकन स्वाइन फीव्हर, क्लासिकल स्वाइन फीव्हर, थिलिरिऑसिस, गॅस्ट्रो-इंटेस्टिनल पॅरासाइटिझम, अँथ्रॅक्स अशा आजारांच्या साथींवर हवानानातील बदलांचा प्रभाव पडतो. बदलत्या हवामानाचा विविध पिके



आणि प्राणी यांच्यावर काय परिणाम होतो, याचा अभ्यास इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चर रिसर्चतर्फे (आयसीएआर) सुरू आहे.

शेंगदाण्यातील अल्टरनेरिया ब्लाइट, तांदळावरील शीथ रॉट आणि ब्लाइट, मोहरी आणि भाज्यांवर उद्भवणारा स्टेमरॉट तसेच अन्य काही पिकांवर येणारे पांढरी माशी यांसारखे आजार हवामानातील बदलांशी थेट संबंधित आहेत. त्याचप्रमाणे, समुद्राच्या पृष्ठभागाच्या तापमानात वाढ होत असल्याने, त्यांचा माशांचा अधिवास, माशांच्या प्रजातींची विपुलता आणि उत्पादन, तसेच माशांच्या वितरणातील आणि प्रजनन हंगामातील बदल यावरही परिणाम होत असल्याचे नोंदवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, हवामानबदलाचा शेतीपिके, जनावरे, फळझाडे आणि मत्स्योत्पादन यावर काय परिणाम होतो याचा अभ्यास, शेतीत हवामान-अनुकूल तंत्रज्ञानाचा विकास, दुष्काळ, पूर, उष्णतेची लाट आदी आपत्तीप्रवण भागांचा अभ्यास 'आयसीएआर'तर्फे केला जात आहे.

## ।। अभंगवाणी ।।



निंदी कोणी मारी ।
वंदी कोणी पूजा करी ॥१॥
मज हें ही नाहीं तें ही नाहीं ।
वेगळा दोहीं पासुनी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# काँग्रेसमध्ये कोणताही वाद नाही!

## महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा दावा; भाजपवर बदनामीचा आरोप

। मुंबई। महाईन्यूज ।

**काँग्रेसमध्ये कसलाही वाद नाही, असा निर्वाळा देत, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपच पक्षाला बदनाम करीत आहे, असा आरोप केला. विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांच्या राजीनाम्याबाबत पटोले यांनी कानावर हात ठेवले. राज्याचे पक्षाचे प्रभारी एच. के. पाटील यांच्या उपस्थितीत रविवारी होणाऱ्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीला पटोले हजर राहणार नाहीत. कसबा पोटनिवडणुकीच्या प्रचारात आपण असणार आहे, असे त्यांनी सांगितले.**

### मोदींच्या दौऱ्यावर टीका

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिनाभरातच मुंबईचा दुसऱ्यांदा दौरा केला, याचा अर्थ निवडणुका जवळ आल्या आहेत. निवडणुकीशिवाय मोदींना मुंबई, महाराष्ट्राची आठवण होत नाही. जानेवारीत मेट्रोचे उद्घाटन व आता वंदे भारत रेल्वेला हिरवा झेंडा दाखवणे हे केवळ निमित्त आहे, असे नाना पटोले म्हणाले.

विधान परिषदेच्या नाशिक पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीवरून काँग्रेसमध्ये बाळासाहेब थोरात विरुद्ध नाना पटोले असा संघर्ष सुरू झाला आहे. पटोले यांच्या कार्यपद्धतीवर व घेतलेल्या काही निर्णयांवर नाराजी व्यक्त करीत थोरात यांनी विधिमंडळ पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला. पक्षातील गटबाजी उघड झाली आहे. त्याची पक्षश्रेष्ठींनी दखल घेतली असून नेत्यांमधील हा वाद मिटविण्यासाठी रविवारी प्रभारी एच. के. पाटील मुंबईत येणार आहेत. पाटील थोरात व इतर नेत्यांशी चर्चा करणार आहेत. त्याचबरोबर प्रदेश काँग्रेस व मुंबई काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. परंतु पटोले बैठकांना उपस्थित राहणार नाहीत. या संदर्भात प्रभारींशी आपले सविस्तर बोलणे झाले आहे, असे त्यांनी सांगितले. पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात



यांनी विधिमंडळ पक्षनेतेपदाचा राजीनामा दिल्यानंतर पक्षांतर्गत वाद चव्हाट्यावर आला. परंतु पटोले यांनी त्याबाबत कानावर हात ठेवले. बाळासाहेब थोरात यांनी राजीनामा दिला आहे की नाही हे मला माहीत नाही, त्यामुळे त्यावर मी काही बोलणार नाही, असे ते म्हणाले.

# ...असे लढवय्ये देशाला नको!

## शरद पवार यांची पंतप्रधानांवर टीका

। नाशिक । महाईन्यूज ।

**संसदेत खासगी कंपन्यांविषयी विरोधकांनी उपस्थित केलेल्या महत्वाच्या प्रश्नांवर पंतप्रधानांनी कुठलेही भाष्य केले नाही. जवळपास ८० मिनिटांच्या भाषणात त्यांनी कष्टकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने एक शब्ददेखील काढला नाही. उलट जे कुणी विरोध करतील, त्यांच्याशी आपण एकटे लढायला तयार असल्याचे सांगितले. देशाची सत्ता, सेना, पोलीस दल हे पाठिशी असल्याने कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडाल तर त्यांच्याशी संघर्ष करायला तयार असल्याचे सांगणारे लढवय्ये देशाला नको आहेत, अशी टीका राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली. कष्टकऱ्यांच्या हिताची जपणूक करणारे, त्यांच्यासाठी संघर्ष करणाऱ्यांची देशाला गरज असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले.**



वीज उद्योगातील आयटकशी संलग्न महाराष्ट्र राज्य विद्युत कामगार महासंघ (महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन) संघटनेच्या त्रवार्षिक तीन दिवसीय अधिवेशनास शुक्रवारपासून येथे सुरुवात झाली. हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर या अधिवेशनाचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी संसदेतील अदानी समुहाबाबत झालेल्या चर्चेचा संदर्भ देत पंतप्रधानांना कामगार, कष्टकरी यांच्या हिताच्या दृष्टीने काही धोरणे स्वीकारली पाहिजे, असे वाटत नसल्याचे नमूद केले. माजीमंत्री छगन भुजबळ यांनी खासगीकरणाच्या दुष्परिणामांकडे लक्ष वेधत ते कदापि होऊ न देण्याची भूमिका मांडली. वीज कंपन्यांचे खासगीकरण झाल्यास केवळ कर्मचारी नव्हे तर, सर्व घटकांचे नुकसान होणार आहे. संसदेत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर न देता वेगळ्याच विषयावर चर्चा केली जात असल्याचे सांगत भुजबळ यांनी भाजपला लक्ष्य केले.

### कष्टकऱ्यांच्या हिताचा एक शब्दही नाही

» कष्टकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने एक शब्ददेखील काढला नाही. उलट जे कुणी विरोध करतील, त्यांच्याशी आपण एकटे लढायला तयार असल्याचे सांगितले. देशाची सत्ता, सेना, पोलीस दल हे पाठिशी असल्याने कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडाल तर त्यांच्याशी संघर्ष करायला तयार असल्याचे सांगणारे लढवय्ये देशाला नको आहेत, अशी टीका राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली.

# पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोटला जाणाऱ्या भाविकांची सोय

## साडेसहा तासांत 455 किमी अंतर पार करणारी ‘वंदे भारत’

। सोलापूर । महाईन्यूज ।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. १०) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून ‘वंदे भारत’च्या दोन गाड्यांना हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या एक्सप्रेसमुळे शिर्डी, नाशिक, पंढरपूर, तुळजापूर व अक्कलकोटला येणाऱ्या भाविकांची सोय झाली आहे. तसेच नोकरदार व शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची देखील सोय होणार आहे.

वंदे भारत एक्सप्रेसने आतापर्यंत भारतातील १०८ जिल्ह्यांना जोडण्यात आले आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील विविध शाळांमधील सुमारे ३२ हजार विद्यार्थ्यांनी ‘वंदे भारत’ या थीमवर चित्रकला, लेखन आणि भाषण स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. त्या स्पर्धांमधील विजेत्यांनी पहिल्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज



टर्मिनस, मुंबई येथून त्या एक्सप्रेसने मोफत प्रवास केला. मुंबई-सोलापूर ‘वंदे भारत’ ट्रेन ही देशातील नववी ट्रेन आहे. जी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि सोलापूर दरम्यान कनेक्टिव्हिटी वाढवणारी आहेल. व्यापारी राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाच्या नवीन ट्रेनने महाराष्ट्रातील कापड आणि हुतात्मा शहराशी जोडले गेले. त्यामुळे सोलापूरमधील सिद्धेश्वर, अक्कलकोट, तुळजापूर, सोलापूरजवळील पंढरपूर आणि पुण्याजवळील आळंदी ही तीर्थक्षेत्रेही जलदगतीने जोडली जाणार आहे.

# अदानीमुळे गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान!



## न्यायालयाने केली 13 फेब्रुवारीपर्यंत सुनावणी तहकूब

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**हिंडेनबर्गने आरोप केले आणि अदानी समुहाचे शेअर्स कोसळले. यामुळे गुंतवणूकदारांचे लाखो कोटींचे नुकसान झाले, असे मत सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी व्यक्त केले. भविष्यात भारतीय गुंतवणूकदारांचे नुकसान होणार नाही यासाठी काय उपाय योजना केल्या जाणार आहेत याची माहिती सादर करण्याचे आदेशही न्यायालयाने SECURITIES AND EXCHANGE BOARD OF INDIA (सेबीला) दिले आहेत.**

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचुड, न्या. पी. एस. नरसिम्हा, न्या. जे.बी. पारदीवाला यांच्या पीठासमोर ही सुनावणी झाली. अदानी समुहावरील आरोपामुळे भारतीय गुंतवणूकदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. असे नुकसान भविष्यात होऊ नये यासाठी सेबी काय करणार आहे, अशी विचारणा न्यायालयाने केली. याचे उत्तर पुढील सुनावणीत सेबीने सादर करावे, असे आदेश देत न्यायालयाने ही सुनावणी १३ फेब्रुवारीपर्यंत तहकूब केली.

### तज्ज्ञ समिती स्थापन करणार- सर्वोच्च न्यायालय

**हे प्रकरण हाताळण्यासाठी आम्ही तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचा विचार करत आहोत. त्यामुळे सेबीची आताची कार्यपद्धती नेमकी कशी आहे. सेबीचे अधिकार काय आहेत हे आम्हाला जाणून घ्यायाचे आहे. शेअर बाजारातील तज्ज्ञ, निवृत्त न्यायाधीश, आंतरराष्ट्रीय कायदेशीर वित्त तज्ज्ञ हे या तज्ज्ञ समितीमध्ये असतील. या समितीसोबतच सेबीलाही तपासासाठी विशेष अधिकार दिले जातील, असे न्यायालयाने सांगितले.**

हे प्रकरण भारताबाहेर घडले आहे, असे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले. मात्र आता हा घोटाळा आता उघड झाला आहे. पुढे याची व्याप्ती वाढेल. भारतात छोटे गुंतवणूकदारही आहेत. शेअर बाजार हा सन १९९० सारखा राहिलेला नाही. शेअर बाजारातील गुंतवणूक वाढली आहे.

ही गुंतवणूक श्रीमंतांची नाही तर सर्वसामान्य नागरिकही शेअर बाजारात गुंतवणूक करत आहेत. त्यांचे हित जपायला हवे. त्यांच्यासाठी सेबी काय करणार, असा सवाल न्यायालयाने केला. मात्र यावर आता बोलणे योग्य ठरणार नाही.



कारण हिंडेनबर्गचा अहवाल भारताबाहेर आहे, असे सॉलिसिटर जनरल मेहता यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणले.हिंडेनबर्ग अहवालाची पोलीस तक्रार नोंदवून चौकशी करावी, अशी मागणी करणारी जनहित याचिका ADV मनोहर लाल शर्मा यांनी केली आहे. तर ADV विशाल तिवारी यांनी स्वतंत्र याचिका दाखल करुन हिंडेनबर्ग अहवालाची निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे. या याचिकांवर सरन्यायाधीश चंद्रचुड यांच्या पीठासमोर सुनावणी झाली.

---

# हरियाणा सरकारचे अजब धोरण!

## डॉक्टरांसाठी लागू केला नवा ड्रेस कोड

।हरियाणा । महाईन्यूज ।

रुग्णायातील कर्मचाऱ्यांना लगेच ओळखता यावे तसेच रुग्णांना उत्तम उपचार देता यावेत यासाठी हरियाणा सरकारने डॉक्टरांसाठी ड्रेस कोड लागू केला आहे. त्यासाठी सरकारने निर्देश जारी केले असून राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांत सेवा देणाऱ्या डॉक्टरांना हा ड्रेस कोड लागू असेल. सराकरने जारी केलेल्या निर्देशानुसार डेनिम जिन्स, स्कर्ट, बॅकलेस टॉप, पलाझो पँट घालण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच महिला डॉक्टरांना मेकअपही करता येणार नाही. याच कारणामुळे हरियाणा सरकारच्या या निर्णयावर संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहे. हरियाणा सरकारने ९ फेब्रुवारी रोजी डॉक्टरांच्या ड्रेस कोडबाबत एक धोरण जारी केले आहे. या धोरणानुसार राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांत सेवा देणाऱ्या डॉक्टरांना ड्रेस कोडची सक्ती करण्यात आली आहे. सोबतच कोणत्या प्रकारचे कपडे परिधान करू नयेत, याची सूची देण्यात आली आहे. या नव्या धोरणानुसार डॉक्टरांना डेनिम जिन्स, पलाझो पॅन्ट, बॅकलेस टॉप, स्कर्ट्स परिधान करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच महिला डॉक्टरांना मेकअप करता येणार नाही. तसेच कामावर असताना महिला डॉक्टरांना दागिने घालता येणार नाहीत. तसेच पुरुष डॉक्टरांना आपल्या शर्टच्या कॉलरपर्यंतच केस ठेवता येतील.



### ...तर अनुपस्थित असल्याचे गृहित धरणार

**हरियाणा सरकारने ९ फेब्रुवारी रोजी राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांना आपल्या नव्या धोरणाबाबत कळवलेले आहे. तसेच जे डॉक्टर्स हे नियम पाळणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. कामावर असले तरी ते अनुपस्थित आहेत, असे गृहित धरण्यात येईल, असेही सांगण्यात आले आहे.**

### कोणते कपडे परिधान करण्यास मनाई?

**हरियाणा सरकारच्या या धोरणानुसार डेनिम जिन्स परिधान करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच स्वेट शर्ट्स, डेनिम स्कर्ट, शॉर्ट्स, स्ट्रेचेबल टी शर्ट किंवा पॅन्ट, बॉडी हगिंग पॅन्ट, वेस्ट लेंथ टॉप्स, स्ट्रॅपलेस टॉप, बॅकलेस टॉप, क्रॉप टॉप, डीप नेक टॉप, ऑफ शोल्डर ब्लाऊज, स्निकर्स, स्लिपर्स परिधान करता येणार नाही. या नव्या धोरणात, सुरक्षारक्षक, वाहनचालक, स्वच्छता कर्मचारी, स्वयंपाक कर्मचारी यांनादेखील ड्रेस कोड ठरवण्यात आलेला आहे.**

---

# GST कौन्सिलच्या धर्तीवर पेन्शनर्ससाठी कौन्सिल तयार करा

## खासदार सुप्रिया सुळेंची मागणी

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

पेन्शनर्ससाठी जीएसटी कौन्सिलच्या धर्तीवर केंद्र सरकार व राज्य सरकाराने एकत्र येऊन एक कौन्सिल तयार करावी. या परिषदेच्या माध्यमातून एक निश्चित अशी प्रणाली तयार करता येणे शक्य होईल, यामुळे पेन्शनर्सचा ताण कमी होईल, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सभागृहात केली. दरम्यान काही राज्यांनी जुनी पेन्शन स्कीम सुरु केली असल्याची आठवणही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी यानिमित्ताने सरकारला करुन दिली.

पेन्शन स्कीमचा (ईएसओपी) मुद्दा सभागृहात उपस्थित झाला असून हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे, तो आवर्जून नमूद करताना देशातील साठ लाख पेन्शनर्सनी एका दिवसाचे उपोषण केले होते. त्यांचे प्रतिनिधी ४ मार्च रोजी पंतप्रधानांनादेखील भेटले होते. यावेळी त्यांनी सरकार यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने जो आदेश



दिला आहे त्याचे पालन करेल असे आश्वासन दिले होते त्याचे काय झाले असा प्रश्न खासदार सुप्रियाताई सुळे यांनी यावेळी विचारला. यासंदर्भात महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल भगतसिंग कोश्यारी समितीने एक अहवाल तयार केला आहे. त्याबाबतही गेल्या नऊ वर्षांमध्ये सरकारने काहीही केलेले नाही ही बाबही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी निदर्शनास आणून दिली.

पंतप्रधानांनी या पेन्शनर्सना त्यांच्या हक्काचा पैसा देणार असल्याचे वचन दिले आहे. या पेन्शनर्सनी आपल्या वेतनातून ४७० रुपये, ५४१ रुपये , १२५० रुपये योगदान दिले आहे. त्यांना आता मासिक निवृत्तीवेतन ४६० रुपये आहे. एवढ्या तुटपुंज्या रकमेत त्यांचा निर्वाह कसा काय होऊ शकतो असा प्रश्न उपस्थित करताना या लोकांनी हा देश घडविण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांना आपण वाऱ्यावर कसे सोडू शकतो असा संतप्त सवालही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी उपस्थित केला.

**पंतप्रधानांनी या पेन्शनर्सना त्यांच्या हक्काचा पैसा देणार असल्याचे वचन दिले आहे. या पेन्शनर्सनी आपल्या वेतनातून ४७० रुपये, ५४१ रुपये , १२५० रुपये योगदान दिले आहे. त्यांना आता मासिक निवृत्तीवेतन ४६० रुपये आहे. एवढ्या तुटपुंज्या रकमेत त्यांचा निर्वाह कसा काय होऊ शकतो असा प्रश्न उपस्थित करताना या लोकांनी हा देश घडविण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांना आपण वाऱ्यावर कसे सोडू शकतो असा संतप्त सवालही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी उपस्थित केला.**

# रंगावरुन ट्रोल करणाऱ्यांना काजोलचं मजेशीर उत्तर

बॉलिवूड अभिनेत्री काजोलने बॉलिवूडमधील 90 चा काळ गाजवला. अनेक चित्रपटांमध्ये उत्तम अभिनय करुन प्रसिद्धी मिळवली. काजोलने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. परंतु पूर्वीपासूनच काजोलला तिच्या रंगावरुन ट्रोल केलं जातं. अशा ट्रोलर्सना काजोल नेहमीच सडेतोड उत्तर देताना देखील दिसते. अशातच पुन्हा काजोलने रंगावरुन प्रश्न विचारणाऱ्यांना गमतीशीर उत्तर दिलं आहे आणि तिचा सावळा रंग गोरा कसा झाला हे देखील तिने सांगितलं आहे.

खरं तर, अनेकदा काजोलला तिच्या रंगावरुन ट्रोल केलं जातं. पूर्वी काजोलचा रंग जास्त सावळा होता. पण अलीकडे काजोलचा रंग उजळला आहे. काजोल अलीकडे शेअर करत असलेल्या फोटोंवरुन काजोलच्या रंगात बदल झाल्याचे दिसून येते. अनेकदा युजर्स तिच्या फोटोंवर कमेंट्स करत रंगाबाबत प्रश्न विचारतात. दरम्यान, काजोलने तिच्या इंस्टाग्रामवर तिचा नवीन फोटो शेअर केला आहे. या फोटोसोबतच काजोलने अशा लोकांना सडेतोड उत्तर दिले आहे जे अभिनेत्रीला तिच्या गोऱ्या रंगाचे रहस्य विचारतात.काजोलच्या या फोटोमध्ये तिचा चेहरा पूर्णपणे मास्कने झाकलेला आहे, काजोलसोबत काजोलने सनग्लासेस देखील घातला आहे. या फोटोच्या कॅप्शनमध्ये काजोलने लिहिले आहे की, 'हे उत्तर त्या लोकांना, जे मला गोरा असण्याचे रहस्य वारंवार विचारतात.' असं काजोल म्हणली.

काजोलचा 'सलाम वेंकी' ओटीटीवर होणार प्रदर्शित

नुकत्याच काही दिवसांपूर्वी काजोलने 'सलाम वेंकी' चित्रपटातून पुनरागमन केले होते. बॉक्स ऑफिसवर हा फारसा उत्तम चालू शकला नाही. दरम्यान 10 फेब्रुवारी पासून हा ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे.





# किरण मानेंना लॉटरी लागली!

मराठी अभिनेता किरण माने 'बिग बॉस मराठी' शोमुळे प्रसिद्धीझोतात आले. या शोमधून त्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली. तल्लख बुद्धीने किरण मानेंनी घरातील सदस्यांसह प्रेक्षकांनाही त्यांची दखल घ्यायला भाग पाडलं होतं. उत्तम खेळी करत किरण मानेंनी 'बिग बॉस मराठी'च्या चौथ्या पर्वाच्या टॉप ५ फायनलिस्टमध्ये स्थान मिळवलं होतं. परंतु, त्यांना तिसऱ्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

'बिग बॉस'च्या घरातून बाहेर पडल्यानंतर किरण मानेंना प्रेक्षकांकडूनही भरभरुन प्रेम मिळालं. आता किरण माने त्यांच्या चाहत्यांसाठी एक खूशखबर घेऊन आले आहेत. लवकरच माने नव्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. किरण मानेंना लॉटरी लागली आहे. दिग्दर्शक महेश मांजरेकरांच्या प्रोजेक्टमध्ये ते सध्या काम करत आहेत. मानेंनी त्यांच्या सोशल मीडियावरुन सेटवरील एक फोटो शेअर केला आहे.“'वास्तव' हे हाय की, आता 'कॅमेरा' माझी आन् मी कॅमेऱ्याची पाठ सोडत नसतोय. मी येतोय भावांनो...लवकरच...एका नादखुळा भूमिकेत...वुईथ 'द महेश मांजरेकर’! अपनी कुर्सी की पेटी बांध लीजिए...मौसम बिगड़ने वाला है...” असं कॅप्शन मानेंनी पोस्टला दिलं आहे. त्यांच्या या पोस्टवर चाहत्यांनी कमेंट करत शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.



# “आयुष्यात उरलेली वर्ष...” ऐश्वर्या नारकर

ऐश्वर्या नारकर हे मराठी मालिका, नाटक, चित्रपटसृष्टीतील एक मोठं नाव आहे. सध्या त्या झी मराठी वाहिनीवरील 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' या मालिकेत अभिनेत्री ऐश्वर्या नारकर नकारात्मक भूमिका साकारत आहेत. ऐश्वर्या नारकर यांनी नुकतंच शॉर्ट परिधान केलेला एक फोटो शेअर केला होता. त्यावरुन त्यांना ट्रोलिंगचा सामना करावा लागला. नुकतंच त्यांनी यावर सडेतोड उत्तर दिलं आहे.



काही दिवसांपूर्वी ऐश्वर्या नारकर यांनी शॉर्ट्स परिधान एक फोटो शेअर केला होता. त्या फोटोवर काही नेटकऱ्यांनी कमेंट करत ट्रोल करण्यास सुरुवात केली होती. तुम्ही छोटे कपडे कसे घालता? म्हातारवयात हे धंदे कसे सुचतात? अशा अनेक कमेंट काहींनी केल्या होत्या. एका मुलाखतीत त्यांना याबद्दल विचारण्यात आले. त्यावर त्यांनी भाष्य केले. “मी आतापर्यंत कधीही शॉर्ट्स घातली नव्हती. कॉलेजमध्ये असताना मी कधी जीन्स देखील घातली नव्हती. आता कुठे मी स्लिव्हलेस ब्लाऊज घालायला लागले आहे. मला ज्या कपड्यात योग्य वाटतं, ते कपडे मी घालते. त्यादिवशी मी शॉर्ट्स घातली, तेव्हा मला फार कम्फर्टेबल वाटत होतं.मी गेल्या १८ ते २० वर्षांपासून योगा करते. आता कुठे मी माझी लाइफस्टाइल लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करते. मला असं वाटतं की ज्याला ज्या कपड्यांमध्ये कम्फर्टेबल वाटतं, त्याने ते कपडे घालायला काहीच हरकत नाही. त्यामुळे अशा कमेंट्स करुन उगाचच आपली शक्ती वाया घालवू नका. जर तुम्हाला आवडत नसेल तर अनफॉलो करण्याचा ऑप्शन तुमच्याकडे असतो किंवा आम्हाला हे आवडलं नाही, असंही तुम्ही चांगल्या भाषेत सांगू शकता. त्यामुळेच उगाचच दुसऱ्याला ट्रोल करण्यात वेळ वाया घालवू नका.

आपल्याला त्यात काय चांगलं घेता येईल ते पाहावं. ज्या वेळेला आपण एक बोट दुसऱ्याकडे दाखवतो तेव्हा उरलेली चार बोटं ही आपल्याकडे असतात. आपण किती फिट आहोत हे बघणं महत्वाचं आहे. मला हे करण्यात फिजिकली छान वाटतंय, त्यामुळे मी काही वेगळं करतेय असं मला वाटत नाही मला ती शॉर्टस वाढदिवसाचे गिफ्ट म्हणून मिळाले होते. मी ते फोटो पोस्ट करणारही नव्हते, पण मला ते चांगले आणि योग्य वाटले, म्हणून मी ते पोस्ट केले होते. आता आयुष्यातली ५० वर्षे गेलीत, उरलेली किती हातात आहेत ते माहीत नाही. पण जे आहे त्यात आनंदी राहावं अशी माझी इच्छा आहे”,

# जडेजा-अक्षरची अर्धशतकं!

## डावखुऱ्या जोडीने कांगारूंना आणले जेरीस: 144 धावांची भारताकडे भक्कम आघाडी

। नागपूर ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील चार सामन्यांच्या बॉर्डर-गावसकर कसोटी मालिकेतील पहिला सामना नागपुरात खेळवला जात आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला असून या सामन्यात ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात १७७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताने सात गडी गमावून ३२१ धावा केल्या. भारताकडे १४४ धावांची आघाडी असून रवींद्र जडेजासह अक्षर पटेल खेळपट्टीवर तंबू ठोकून आहेत. आजच्या दिवसाचे वर्णन करायचे झाल्यास 'रोहितने रचला पाया, जडेजा-अक्षर झालासे कळस' असे म्हणता येईल. दिवसभराचा खेळ पाहता कांगारूंना नाकेनऊ आणले असेच म्हणता येईल.**

भारतीय संघाने क्रिकेटला एकापेक्षा एक क्रिकेटपटू दिले आहेत. त्यामध्ये रोहित शर्मा या दिग्गज खेळाडूचाही समावेश आहे. रोहित सध्या भारतीय संघाच्या कर्णधारपदाची धुरा सांभाळतोय. ही जबाबदारी पार पाडत असताना तो संघाला विजय मिळवून देण्यासोबतच विक्रमांचा घाटही घालताना दिसत आहे. सध्या सुरू असलेल्या भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया संघातील पहिल्या कसोटी सामन्यातील पहिल्या डावात रोहितने दमदार कामगिरी केलीये. त्यामुळे त्याच्यासाठी 'लिडिंग फ्रॉम फ्रंट' हा शब्दप्रयोग केला, तर अतिशयोक्ती ठरणार नाही. त्याने यादरम्यान एक शतक झळकावत एक खास विक्रम स्वत:च्या नावावर रचला आहे.ऑस्ट्रेलियाचा डाव १७७ धावांवर गुंडाळल्यानंतर रोहित भारताकडून सलामीला फलंदाजीसाठी उतरला होता. तो दुसऱ्या दिवसाच्या तिसऱ्या सत्रापर्यंत टिकला. मात्र, पॅट कमिन्सच्या ८१व्या षटकातील चौथ्या चेंडूवर त्याला बाद व्हावे लागले. यावेळी रोहितने २१२ चेंडूंचा सामना करत १२० धावा चोपल्या. या धावा त्याने २ षटकार आणि १५ चौकारांच्या मदतीने चोपल्या. हे शतक करताच रोहित विक्रमवीर बनला.



**दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला**

भारतीय संघाने सात गडी गमावून ३२१ धावा केल्या आहेत. चहापानानंतर भारताला मोठा धक्का बसला. रोहित २१२ चेंडूंत १५ चौकार व २ षटकार खेचून १२० धावांवर बाद झाला. पॅट कमिन्सने त्याचा त्रिफळा उडवला. मर्फीने पदार्पणवीर केएस भरतची (८) विकेट घेतली आणि पदार्पणात डावात पाच विकेट्स घेणारा ऑस्ट्रेलियाचा तिसरा फिरकीपटू ठरला. २००८मध्ये जेसन क्रेझाने ८/२१५ (वि. भारत) आणि नॅथन लियॉनने २०११मध्ये ५/३४ (वि. श्रीलंका) अशी कामगिरी केली होती. अक्षर पटेल ५२ आणि रवींद्र जडेजा ६६ धावांवर खेळत आहे. पहिल्या डावाच्या आधारे भारताला १४४ धावांची आघाडी मिळाली आहे. टीम इंडियाच्या अजून तीन विकेट शिल्लक आहेत. अशा स्थितीत भारताला सामन्याच्या तिसऱ्या दिवशी मोठी धावसंख्या उभारायची आहे.

### आतापर्यंतच्या सामन्यात काय घडलं?

**» ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना १७७ धावा केल्या. ४९ धावा करणारा मार्नस लाबुशेन संघाचा सर्वोत्कृष्ट स्कोअरर ठरला. स्टीव्ह स्मिथने ३७ आणि अॅलेक्स कॅरीने ३६ धावा केल्या. भारताकडून जडेजाने पाच आणि अश्विनने तीन विकेट्स घेतल्या. प्रत्युत्तरात भारताने सात गडी गमावून ३२१ धावा केल्या. भारतीय कर्णधार रोहित शर्मा १२० धावा करून बाद झाला. त्याचवेळी रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेल अर्धशतकांसह खेळत आहेत. ऑस्ट्रेलियाकडून टॉड मर्फीने पाच बळी घेतले असले तरी भारताकडे १४४ धावांची आघाडी आहे. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारताने आणखी ५० धावा केल्या तर टीम इंडिया सहज सामना जिंकू शकेल.**

# नाचता येईना अंगण वाकडे'!

## ऑस्ट्रेलियाचा खेळाडू रिकी पॉंटिंगने स्वतःच्याच संघाला सुनावले खडेबोल

।नागपूर ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

नागपूर कसोटीत ऑस्ट्रेलियाचा संघ १७७ धावांत गुंडाळल्यानंतर ऑस्ट्रेलियाचा दिग्गज खेळाडू रिकी पॉंटिंगने खेळपट्टीवर आपले मत मांडले आहे. टर्निंग विकेट तयार करणे ही ऑस्ट्रेलियाला पराभूत करण्याची भारतासाठी सर्वोत्तम संधी असल्याचे पॉंटिंगचे मत आहे. मात्र, ऑस्ट्रेलियन खेळाडूंना खेळपट्टीवर प्रश्न विचारण्याचा अधिकार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पॉंटिंग म्हणाला, "आजची खेळपट्टी तशीच खेळेल अशी मला अपेक्षा होती. मला त्याची झलक मिळाली. मात्र, ऑस्ट्रेलियाला हरवण्याची भारताला सर्वोत्तम संधी म्हणजे टर्निंग खेळपट्टी तयार करणे, कारण आमच्या फलंदाजांना ते अवघड जाणार आहे. कारण त्यांना वाटेल की त्यांचे फिरकी गोलंदाज ऑस्ट्रेलियापेक्षा चांगले आहेत."

पॉंटिंग म्हणाला, "वस्तुस्थिती अशी आहे की ऑस्ट्रेलिया येथे दोन उजव्या हाताच्या ऑफस्पिनर्ससह खेळत आहे, त्यापैकी एक पदार्पण करत आहे. यातून भारताला नक्कीच फायदा झाला आहे. त्यामुळे हे का केले गेले हे मी समजू शकतो. तसेच, पॉंटिंगने सांगितले की क्रिकेट ऑस्ट्रेलिया किंवा खेळाडूंना हवे तसे खेळपट्टी कसे तयार केले जातात याबद्दल काहीही सांगता येत नाही." तो म्हणाला, "मला वाटते की भारत आणि ऑस्ट्रेलियासारख्या ठिकाणांमध्ये फरक एवढाच आहे की मला माहित आहे की ऑस्ट्रेलियातील खेळाडू खेळपट्टी कशी तयार करतात यावर प्रश्न विचारू शकत नाहीत. मी खेळत असताना काही वर्षांमध्ये परिस्थिती बदलली नाही तोपर्यंत क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या कर्णधारांपैकी कोणीही किंवा कोणीही मैदानावरील खेळाडूंशी बोलले नाही. शक्य तितक्या चांगल्या पद्धतीने खेळपट्टी तयार करण्याचे काम तुम्ही मैदानावर सोडले आहे."प्रत्येक खेळपट्टीचे वेगळे मूल्य

तुलनात्मक खेळपट्ट्यांवर बोलताना तो म्हणाला, "ऑस्ट्रेलियात कसोटी क्रिकेट खेळण्याचे मूल्य प्रत्येक ठिकाणच्या विकेटवर खूप वेगळे असते. पर्थ आणि ब्रिस्बेनमध्ये दोन वेगवेगळ्या खेळपट्ट्या आहेत. तुम्हाला मेलबर्न आणि सिडनी मिळतात, ते थोडे वेगळे आहेत. मेलबर्न हे नेहमीच थोडे संथ राहिले आहे आणि अॅडलेड हे असे ठिकाण आहे जिथे तुम्ही गेल्या सहा किंवा सात वर्षांपासून गुलाबी चेंडूच्या कसोटी खेळत आहात. त्यामुळे तुम्हाला तेथेही विविधता मिळेल."

**रोहित शर्माचे शानदार शतक**

भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा याने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात अप्रतिम प्रदर्शन केले. रोहितने मागच्या मोठ्या काळापासून कसोटी क्रिकेटमध्ये शतक केले नव्हते.

### जडेजाच्या गोलंदाजीवर केले वक्तव्य

**» जडेजाच्या उत्कृष्ट गोलंदाजीवर पॉंटिंग म्हणाला, "तो अशा प्रकारच्या खेळपट्टीवर गोलंदाजी करतो. तो ज्या वेगवान गोलंदाजी करतो तो उजव्या हाताच्या फलंदाजांना त्रासदायक ठरतो. नेहमी तो चेंडू स्टंपवर फेकत असतो जो पूर्णपणे वळतो. तो म्हणाला की या संपूर्ण मालिकेत तो सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज बनू शकतो असे मला वाटते."**



# भारत-पाकिस्तान यांच्यात रविवारी महामुकाबला!

। नाशिक । महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

महिला टी २० विश्वचषक आजपासून (१० फेब्रुवारी) सुरू होत आहे. दक्षिण आफ्रिकेत खेळल्या जाणाऱ्या या विश्वचषकात भारतीय संघ आपला पहिला सामना १२ फेब्रुवारीला रविवारी पाकिस्तानविरुद्ध खेळणार आहे. केपटाऊनच्या न्यूलँड्स स्टेडियमवर हा सामना खेळवला जाईल. भारतीय वेळेनुसार हा सामना सायंकाळी साडेसहा वाजता सुरू होईल.

महिला भारतीय संघ आणि पाकिस्तान यांच्यात आतापर्यंत एकूण १३ टी २० आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले आहेत. यामध्ये भारतीय संघाने १० सामने जिंकले आहेत. तर पाकिस्तानने केवळ तीन सामने जिंकले आहेत.




अशा स्थितीत या सामन्यातही भारताच्या विजयाची शक्यता अधिक दिसत आहे. महिला भारतीय संघ आणि पाकिस्तान यांच्यात आतापर्यंत एकूण १३ टी २० आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले आहेत. यामध्ये भारतीय संघाने १० सामने जिंकले आहेत. तर पाकिस्तानने केवळ तीन सामने जिंकले आहेत. अशा स्थितीत या सामन्यातही भारताच्या विजयाची शक्यता अधिक दिसत आहे.

स्मृती मांधना, हरमनप्रीत कौर, शेफाली वर्मा व जेमिमा रॉड्रिग्स या चार खेळाडूंच्या खांद्यावर भारताची फलंदाजी अवलंबून असणार आहे.

### संभाव्य प्लेइंग इलेव्हन

**» हरमनप्रीत कौर (कर्णधार), रिचा घोष (विकेटकीपर), राधा यादव, यास्तिका भाटिया, स्मृती मांधना, अंजली सरवानी, जेमिमा रॉड्रिग्ज, दीप्ती शर्मा, शेफाली वर्मा, स्नेह राणा आणि शिखा पांडेआहे.**